Vol 6 Issue 11 Dec 2016

ISSN No : 2230-7850

International Multidisciplinary Research Journal

# Indian Streams Research Journal

Executive Editor
Ashok Yakkaldevi

Editor-in-Chief
H.N.Jagtap

## Welcome to ISRJ

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2230-7850**

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

**Regional Editor**

Dr. T. Manichander

Mr. Dikonda Govardhan Krushanahari
Professor and Researcher ,
Rayat shikshan sanstha's, Rajarshi Chhatrapati Shahu College, Kolhapur.

## *International Advisory Board*

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.org**

Indian Streams Research Journal

ISSN: 2230-7850 Impact Factor : 4.1625(UIF) Volume - 6 | Issue - 11 | December - 2016

# आंबेडकरी राजकारणाची तात्विक आणि व्यावहारिक मीमांसा

प्रा.डॉ.भगवान माने
राज्यशास्त्र विभाग आणि संचालक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन आणि विकास केंद्र,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

## प्रस्तावना –

आंबेडकरी राजकारणावर तथागत, गौतमबुध्द, संत कबीर, महात्मा जोतीबा फुले यांच्या विचारांचा प्रभाव पडलेला आहे आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची 'राजकीय सत्ता संकल्पना' तात्विक किंवा नैतिक मूल्यांवर आधारित आहे. अस्पृश्य, दलित किंवा दबलेला समाज सत्ताधारी समाज बनला पाहिजे अशी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची राजकीय सत्ता-संकल्पनेची भूमिका होती. स्वातंत्र्यपूर्व काळात इतर अल्पसंख्याक समाजाच्या राजकीय हक्कांचा विचार केला होता. परंतु अस्पृश्य समाजाच्या राजकीय हक्कांसाठी कोणीही आग्रह धरलेला नव्हता. कारण अस्पृश्य समाजाला राजकीय हक्क प्राप्त झाले तर काँग्रेसचे मोठे नुकसान होईल याची काँग्रेसच्या राजकीय श्रेष्ठीजनांना जाणीव होती. महात्मा गांधीजींनी सुध्दा अस्पृश्यांच्या राजकीय प्रतिनिधीत्वाला विरोध केला होता. दलित किंवा दबलेल्या समाजाचे कायदेमंडळात प्रतिनिधीत्व झाले पाहिजे आणि काँग्रेसच्या कारभारावर नियंत्रण ठेवण्यासाठी प्रभावी विरोधी राजकीय पक्ष असला पाहिजे, या उद्देशाने स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना केली होती. त्यानंतर 'शेड्यूल्ड कास्ट फेडरेशन' आणि रिपब्लिकन पक्षाद्वारे आंबेडकरी राजकारणाची वाटचाल सुरू आहे. काँग्रेसपक्षाने आंबेडकरी राजकारणाला राजकीय सत्तेपासून रोखण्याचा सुरूवातीपासून प्रयत्न केला



आहे आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महानिर्वाणानंतर आंबेडकरी राजकीय श्रेष्ठीजन आणि समाजाने आंबेडकरी राजकारणाच्या अस्तित्वाचा प्रश्न निर्माण केला आहे.

## आंबेडकरी राजकीय विचारधारा –

आंबेडकरी राजकारणाची तात्विक आणि व्यावहारिक मीमांसा करताना आंबेडकरी राजकीय विचारधारा म्हणजे काय, यासंबंधी माहिती घेणे आवश्यक ठरते. थोडक्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची राजकीय सत्ता हस्तगत करणे, राजकीय विचार, राजकीय दृष्टिकोन, राजकारणाची सैध्दांतिक मांडणी, इत्यादी विषयीची तात्विक आणि व्यावहारिक मांडणी यासंबंधीचे मौलिक विचार म्हणजे आंबेडकरी राजकीय विचारधारा होय. आधुनिक काळात जेलीनेक, सिज्विक, पोलॉक, पॉलजेनेट या राज्यशास्त्रज्ञांनी राजकारण (पॉलिटिक्स) शब्दाचा प्रथम वापर केला. त्यानुसार राजकारणाचा अभ्यास सैध्दांतिक किंवा तात्विक आणि व्यावहारिक राजकारण (प्रॅक्टिकल पॉलिटिक्स) या अंगाने होऊ लागला. राजकारण गतिमान असून बदलत्या परिस्थितीचा राजकारणावर प्रभाव पडतो. विचारधारेतून विशिष्ट आशा विचारांचा प्रचार आणि प्रसार केला जातो. त्यामुळे कोणत्याही राजकीय व्यवस्थेच्या सक्षमीकरणासाठी विचारधारा किंवा विचार महत्वाचा ठरतो. विचारासंबंधी डॉ. बाबासाहेब आंबेडकर असे म्हणतात की, "ज्याप्रमाणे रोपटयांना पाण्याची आवश्यकता असते, अन्यथा त्याच्याविना ती करपून जातात, त्याचप्रमाणे विचारांनासुध्दा प्रचार व प्रसाराची नितांत आवश्यकता आहे. अन्यथा प्रचार आणि प्रसाराअभावी ते नष्ट होतील." यावरून असे स्पष्ट होते की, विचारधारा ही सातत्याने चालणारी प्रक्रिया आहे.

डॉ. बाबासाहेब यांच्या राजकीय विचारधारेची माहिती ॲनिहिलेशन ऑफ कास्ट (१९३७), फेडरेशन व्हर्सेस फ्रीडम (१९३९), रानडे गांधी ॲन्ड जिना (१९४३), पाकिस्तान ऑर दि पार्टिशन ऑफ इंडिया (१९४५), व्हॉट काँग्रेस ॲन्ड गांधी हॅव डन टू दि अनटचेबल्स (१९४६), स्टेट्स ॲन्ड मायनॉरिटीज (१९४७) इत्यादी ग्रंथातून मिळते. तसेच व्यावहारिक राजकारणात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची साऊथबरो कमिटीसमोरील साक्ष (१९१९), मूकनायक (१९२०-१९२३), बहिष्कृत भारत (१९२७-१९२९), जनता (१९२९-१९५६), मधील संपादकीय लेख, गोलमेज परिषदेतील भाषणे (१९३०-१९३२) संविधान सभेतील राजकीय हक्कांसंबंधीची चर्चा इत्यादींमधून त्यांच्या राजकीय विचारधारेची माहिती स्पष्ट होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या राजकीय विचारधारेचा लक्ष्यबिंदू देशाच्या संसदेची सत्ता अस्पृश्य, दलित किंवा दबलेल्या वर्गाच्या हाती असेल असा होता. आंबेडकरी राजकारणाचा उद्देश अस्पृश्य समाजाचा आत्मसन्मान जागृत करणे, राज्यकर्ती जमात बनने, राजकारणातून निर्णयक्षमता निर्माण करणे, आंबेडकरी विचाराच्या राजकीय सभासदांची संख्या वाढविणे, पक्षनेतृत्वावर विश्वास, श्रध्दा आणि शिस्त निर्माण करणे, सभासदांना केडर-कँपद्वारे राजकीय प्रशिक्षण देणे इत्यादी प्रकारचा आहे.

## आंबेडकरी राजकारणाचा वारसा –

स्वातंत्र्यपूर्व काळापासून अस्पृश्य समाजाच्या राजकीय हक्कांची मागणी केली जात होती. २७ जानेवारी १९१९ रोजी साऊथबरो समितीसमोर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्पृश्यांहून अस्पृश्य हा वेगळा गट कसा आहे याची साक्ष दिली होती. डॉ. बाबासाहेब

आंबेडकर यांना अस्पृश्य समाजाला राज्यकर्ती जमात बनवायचे होते. परंतु अस्पृश्यांना राजकीय हक्क मिळू नयेत, म्हणून अस्पृश्यता निवारणाचे कैवारी आणि डिप्रेड क्लास मिशनचे विठ्ठल रामजी शिंदे साऊथबरो कमिटीपुढे उलटी साक्ष देताना म्हणाले, ''बहिष्कृत वर्गाचे प्रतिनिधी कायदेमंडळात जातवार न घेता, निवडून आलेल्या सदस्यांकडून स्वीकृत करावे.'' या साक्षीवरून विठ्ठल रामजी शिंदे यांचा अस्पृश्यता निवारण कार्याचा खोटा मुखवटा जनतेसमोर आला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी विठ्ठल रामजी शिंदे यांची साक्ष म्हणजे 'एक मूर्ख योजना' अशी हेटाळणी केली होती. दिनांक २१ व २२ मार्च १९२० च्या माणगाव परिषदेत ठराव क्रमांक १३ नुसार भावी कायदे कौन्सिलांत बहिष्कृतांचे प्रतिनिधी त्यांच्या लोकसंख्येच्या व गरजेच्या प्रमाणात त्यांच्या स्वतंत्र मतदार संघातून निवडून घेण्यात यावेत अशी या परिषदेची हक्काची मागणी आहे. यावरून असे स्पष्ट होते की, अस्पृश्य समाजाला राजकीय हक्क प्राप्त करून घेताना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागले होते. महात्मा गांधीजींनी इतर अल्पसंख्याक समाजाच्या राजकीय हक्कांसाठी आग्रह धरलेला होता. परंतु अस्पृश्यांच्या राजकीय हक्कासाठी आग्रह धरलेला होता. परंतु अस्पृश्यांच्या राजकीय हक्कासाठी विरोध दर्शविला होता. महात्मा गांधीजींच्या मते ''स्पृश्य आणि अस्पृश्य एकाच समाजाची विभिन्न अंगे आहेत, म्हणून अस्पृश्यांना वेगळे अस्तित्व देऊ नये.'' आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मतानुसार स्वातंत्र्यानंतर निर्माण होणा-या संविधानात अल्पसंख्याकांप्रमाणे अस्पृश्य किंवा दबलेल्या समाजासाठी स्वतंत्र राजकीय अस्तित्व प्राप्त व्हावे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केलेल्या पाठपुराव्यानुसार रॅम्से मॅकडोनाल्डनी १७ ऑक्टोंबर १९३२ रोजी अस्पृश्य समाजाला स्वतंत्र मतदार दिले. अस्पृश्यांना स्वतंत्र मतदारसंघ दिले तर हिंदूचे आणि भविष्यात काँग्रेसच्या राजकारणाचे मोठे नुकसान होईल म्हणून महात्मा गांधीजींनी २० सप्टेंबर १९३२ रोजी स्वतंत्र मतदारसंघाच्या विरोधी पुणे (येरवडा) येथे आमरण उपोषण सुरु केले. यामुळे संपूर्ण देशभर तणाव निर्माण झाला होता. म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी महात्मा गांधीजींचे प्राण वाचविण्यासाठी 'पुणे करारावर' सही केली. पुणे करारानुसार अस्पृश्यांना 'स्वतंत्र मतदारसंघाऐवजी संयुक्त मतदारसंघ देण्यात आले.' पुणे करारानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर अस्पृश्य बांधवांना उद्देशून म्हणाले की, ''पुणे कराराची स्मृती अस्पृश्य जनतेने 'राजकीय दिन' म्हणून साजरी करावी.'' यावरून असे स्पष्ट होते की, पुणे करारात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी राजकारणात जे शक्य आहे ते आधी घेतले पाहिजे, या तत्वाचे पालन केले. राजकारणात तत्वाला किंवा उद्देशाला बाधा येऊ न देता व्यवहार किंवा नीती म्हणून तडजोड करण्याची वेळ आली तर तेही केले पाहिजे. या विचाराने डॉ. बाबासाहेबांनी तडजोड केली असावी असे वाटते.

अस्पृश्य समाजाला राजकीय अस्तित्व प्राप्त झाल्याशिवाय समाजाचा सामाजिक आणि आर्थिक विकास होणार नाही? याची जाणीव होती. म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी ऑगस्ट १९३६ मध्ये स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना केली होती. स्वतंत्र मजूर पक्षाचा जाहिरनामा राज्यसमाजवादावर आधारित होता. स्वतंत्र मजूर पक्षामध्ये स्पृश्य-अस्पृश्य समाजाचे कार्यकर्ते, शेतकरी, मजूर, दलित, गरीब वर्गातील सर्वांचा सहभाग लक्षणीय होता. १९३७ च्या प्रांतिक कायदेमंडळाच्या निवडणुकीत स्वतंत्र मजूर पक्षाने १५ पैकी १३ जागा जिंकल्या होत्या आणि १९३९ पर्यंत स्वतंत्र मजूर पक्षाचा प्रभाव वाढलेला होता. मजूर पक्षामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना एकाचवेळी भांडवलशाही आणि जातीव्यवस्थेविरुध्द लढा द्यावा लागत होता. १९४२ मध्ये स्टॅफर्ड क्रिप्सने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना असा प्रश्न केला की, 'तुम्ही मजुरांचे प्रतिनिधीत्व करता की अस्पृश्य वर्गाचे?' त्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मजूर पक्षाचा विचार सोडून दिला आणि २० सप्टेंबर १९४२ रोजी अखिल भारतीय शेडयूल्ड कास्ट फेडरेशन पक्षाची स्थापना केली. त्याचा मुख्य उद्देश म्हणजे भारतीय संविधान सभेत जे प्रतिनिधी पाठवायचे होते ते या पक्षामार्फत पाठवायचे होते. त्यामुळे संविधानात अस्पृश्य वर्गासाठी काही तरतूदी करता येणे शक्य होणार होते. १९४६ च्या प्रांतिक सरकारच्या निवडणुकीत शे.का.फे.चा 'अस्पृश्यांचा राजकीय पक्ष' म्हणून जातीवादी प्रचार केला. या निवडणुकीत शे.का.फे.चा दारूण पराभव झाला होता. संयुक्त मतदार संघामुळे अस्पृश्य उमेदवारांना सवर्ण हिंदूनी मतदान केले नाही. याचा परिणाम १९५२ आणि १९५४ च्या निवडणुकीवर झाला. १९५४ च्या पोटनिवडणुकीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना पराभव पत्करावा लागला. पराभवानंतर भंडारा येथे भाषण करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शे.का.फे च्या कार्यकर्त्यांना असा उपदेश केला की, ''शेडयूल्ड कास्ट फेडरेशनला या निवडणूकीत अपयश येणे, हे वाऱ्याने झोडपलेल्या झाडासारखे आहे. परंतु याचा अर्थ असा नव्हे की, यामुळे फेडरेशनरूपी झाडाचे मूळच मरून गेले. अस्पृश्य समाजाने इतर समाजातील समविचारी लोकांशी सहकार्य करावे. त्याशिवाय आपल्याला यश मिळणार नाही, निवडणूक हा क्रिकेटचा सामना आहे. क्रिकेटमध्ये पराभव झालेला संघ गाशा गुंडाळून स्वस्थ बसत नाही, तो पुन्हा दुस-या वर्षी नव्या जोमाने खेळावयास प्रारंभ करतो. असाच आशावाद आपण ठेवला पाहिजे.'' यावरून असे स्पष्ट होते की, अनेकवेळा अपयश आले, वरिष्ठ जातींनी विरोध केला, अस्पृश्य समाजातील काही हितचिंतकांनी विरोधी कटकारस्थाने केली तरीसुध्दा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी समाजाच्या राजकीय अस्तित्वासाठीचा लढा कायम सुरु ठेवला होता. स्वातंत्र्यानंतर देशात संसदीय लोकशाहीचा कारभार सुरू झाला, भारत प्रजासत्ताक राज्य निर्माण झाले. संविधानात अस्पृश्य, किंवा दबलेल्या समाजासाठी राखीव जागांच्या तरतूदी करण्यात आल्या होत्या. यापुढे केवळ अस्पृश्य समाजाला घेऊन राजकारणाचे अस्तित्व टिकविता येणार नाही. म्हणून सर्व समाजव्याप्त उद्देशाने शेडयूल्ड कास्ट फेडरेशन पक्षानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी १३ ऑक्टोबर १९५६ रोजी नागपूर येथे अखिल भारतीय रिपब्लिकन पक्षाची घोषणा केली. परंतु ६ डिसेंबर १९५६ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे महानिर्वाण झाले. पुढे १९५७ मध्ये भारतीय रिपब्लिकन पक्षाची स्थापना झाली.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी १९३६ ते १९५६ या वीस वर्षाच्या काळात आंबेडकरी राजकारणाचे अस्तित्व कायम ठेवण्यासाठी अटोकाट प्रयत्न केला. चौपन्न वर्षाच्या प्रदीर्घ कालखंडानंतर ही डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिप्रेत असलेली अस्पृश्य किंवा दबलेल्या वर्गाची राजकीय सत्ता आपण हस्तगत करू शकलो नाही, आंबेडकरी राजकारणाचे अस्तित्व प्रभावशून्य होत आहे काय? याचा पुर्नविचार करणे आवश्यक आहे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मांडलेला राजकीय सिध्दांत आणि व्यवहाराचे आकलन करून घेण्याची आज आवश्यकता भासते.

### *आंबेडकरी राजकारणाचे सिध्दांत आणि व्यवहार–*

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी 'अस्पृश्य समाज' राज्यकर्ती जमात बनली पाहिजे, संसदेची सार्वभौम सत्ता अस्पृश्य वर्गाच्या हातात केंद्रित झाली पाहिजे', असा राजकीय सत्ता-संकल्पनेचा सिध्दांत मांडला आहे. परंतु ही राजकीय सत्तासंकल्पना साधी, सरळ आणि सोपी नाही. ती उदारमतवादी चौकटीत राहूनच राज्यसंस्थेला धक्के देते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची राजकीय सत्ता-संकल्पना समजून घेताना राजकीय सत्तेचा वर्णनात्मक पैलू (डिस्क्रिप्टिव्ह) आणि मूल्यात्मक पैलू (नॉर्मेटिव्ह) महत्वाचे ठरतात. राजकीय सत्तेच्या पहिल्या प्रकारात समाजात सत्ता कशी वावरते यासंबंधीचा विचार असतो आणि दुसऱ्या प्रकारात सत्तेची नीतिमत्ता कशी वापरली जाते. यासंबंधीचा असतो. प्रसिध्द राज्यशास्त्रज्ञ स्टीवन ल्यूकस याच्या सत्तेच्या सिध्दांताशी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा राजकीय सत्ता-संकल्पनेचा सिध्दांत निगडीत आहे. विज्ञानामध्ये ज्याप्रमाणे व्यवहाराचा संबंध जोडला जातो, तसा तंतोतंत संबंध सामाजिक शास्त्रात जोडता येत नाही. कारण राज्यशास्त्राचे क्षेत्र अविवेकाचे (Irrational) क्षेत्र असून त्याचा संबंध वागणुकीशी येत असतो. अल्बर्ट शॅफलने सामाजिक-राजकीय जीवनाचे दोन प्रकार सांगितले, पहिल्या

प्रकारात नित्य आचाराचे क्षेत्र (Routinised Affairs) असते आणि दुसरे क्षेत्र राजकारणाचे असते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सामाजिक व्यवहार राजकीय सत्तेशी जोडण्याचे प्रयत्न केला. राज्यसमाजवाद आर्थिक विचार हा त्याचाच एक भाग होता. महात्मा गांधींजींनी अराज्यवाद-राज्यविरहित समाजाची (Stateless Society) संकल्पना आध्यात्मिक आणि नैतीक अधिष्ठानावर आधारित होती. कार्लमार्क्सने राज्य हे श्रमिकांच्या शोषणाचे साधन असून, समाज शोषणमुक्त होताच ते आपोआप नष्ट होईल, असा विचार मांडलेला होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी राज्यसंस्था मानवनिर्मित असून राज्यसमाजवादातून, कोणतीही रक्तरंजित क्रांती न करता, अध्यात्माऐवजी लोकशाही मूल्यांवर विश्वास ठेवून शांततेच्या मार्गाने सामाजिक आणि आर्थिक परिवर्तन घडून आणता येते. असा मौलिक विचार मांडला आहे. बहुसंख्यांक हिंदूंच्याकडून अल्पसंख्यांक अस्पृश्य समाजावर हजारो वर्षापासू अन्याय-अत्याचार झालेला आहे. अस्पृश्य समाजात राजकीय सत्तेचा अभाव हा त्यांच्या प्रगतीमधील मोठा अडथळा होता. म्हणून राजकीय सत्तेसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर असे म्हणतात की, ''प्रौढ मताधिकारामुळे व संख्यासामर्थ्यामुळे स्वतंत्र भारतातील सत्ता बहुसंख्य हिंदूंच्या हातात जाईल व हा बहुसंख्य हिंदू समाज असमान वाटप होईल. बहुसंख्य हिंदूच्या सत्तेवर कुणाचेही नियंत्रण राहणार नाही. सत्तेच्या चौकटीतून अस्पृश्यांना बाहेर फेकले जाईल. हे सर्व टाळण्यासाठी, सत्तेच्या वाटपात समतोल राखण्यासाठी बहुसंख्य हिंदूच्या सत्तेवर अंकुश ठेवण्यासाठी आणि अस्पृश्य समाजामध्ये आपल्या हिताच्या रक्षणाच्या दृष्टीने करारपात्रता (बार्गेनिंग) आणण्यासाठी त्यांना राजकीय क्षेत्रात जागा मिळाल्या पाहिजेत.'' डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची राजकीय सत्ता-संकल्पना मानवी कल्याणावर आधारित आहे. राज्यकर्त्यानी आपल्या राजकीय सत्तेचा वापर नैतिक आणि सद्भावनेने करावा अशी त्यांची अपेक्षा होती.

### *डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या राजकारणाचा किंवा राजकीय सत्ता – संकल्पनेचा उपदेश–*

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी अस्पृश्य समाजाच्या राजकारणाचे अस्तित्व प्रभावशाली असावे आणि समाजाने राज्यकर्ते व्हावे यासाठी अनेक सभा, अधिवेशने यातून सल्ला, मार्गदर्शन आणि उपदेश केला आहे. दिनांक ७ व ८ मे १९३२ रोजी अखिल भारतीय दलित काँग्रेसच्या अधिवेशनात कामठी (नागपूर) येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले, ''अस्पृश्य समाजाच्या हाती राजकीय सूत्रे येणे फारच आवश्यक आहे. याकरिता सर्व लोकांनी संघटित होऊन आपला राजकीय दर्जा संपादन केला पाहिजे. जोपर्यत या देशाच्या राजकीय नियंत्रणावर अस्पृश्य लोकांचा ताबा चालू शकत नाही तोपर्यत त्यांची अस्पृश्यता जाणार नाही.'' यावरून असे स्पष्ट होते की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना कायदेमंडळाच्या सत्तेद्वारे अस्पृश्य समाजाची उन्नती होईल. याविषयी आत्मविश्वास वाटत होता. लोकशाही शासनव्यवस्थेत सत्ता किंवा अधिकाराला महत्वाचे स्थान आहे आणि 'राजकीय सत्ता' ही सर्व प्रश्नांची चावी असते. सामाजिक आणि आर्थिक प्रश्नांची योग्य दखल घेण्यासाठी राजकीय सत्ता महत्वाची असते. या अनुषंगाने मुंबई वडाळा येथील ५ सप्टेंबर १९३२ रोजीच्या सभेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर असे म्हणतात की, ''आम्हाला दगडांच्या देवालयांची मुळीच जरूर नाही, आम्हाला सहभोजन, रोटीबोटी व्यवहार नको. आमचा लढा फक्त राजकीय सत्तेकरिता आहे. प्रत्येक समाजामध्ये काहीतरी सामर्थ्य आहे. ब्राम्हण समाजाकडे आर्थिक सामर्थ्य नाही, परंतु धार्मीक सत्ता आहे. आपल्या अस्पृश्य समाजाकडे यापैकी कोणतेही सामर्थ्य नाही. म्हणून आपल्या समाजाच्या हाती राजकीय सत्ता असणे फार इष्ट आहे. म्हणून मी गोलमेज परिषदेला गेलो आणि अस्पृश्यांसाठी दहा जागा मिळविल्या.'' यावरून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा राजकीय सत्ता किंवा राजकारणाचा दृष्टिकोन स्पष्ट होतो.

### *आंबेडकरी राजकारणाचे अस्तित्व –*

आंबेडकरी राजकारणाचे अस्तित्व चिरंतन असे आहे. कारण डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या दूरदर्शी, वस्तुनिष्ठ विचारांचा राजकारणाला वारसा लाभलेला आहे. आंबेडकरी राजकारणाचे अस्तित्व सूर्यप्रकाशासारखे स्वच्छ आहे. समता, न्याय, बंधुत्व, अहिंसा, प्रेम आणि मानवता, नैतिकता ही आंबेडकरी राजकारणाची विचारधारा आहे. त्यामुळे भविष्यकाळात आंबेडकरी राजकारण देशाला मार्गदर्शक ठरणार आहे. यामध्ये दुमत असण्याचे कारण नाही.

### *सारांश –*

आंबेडकरी राजकारणाला गतिमान करण्यासाठी समता सैनिक दल, केडरकॅप याद्वारे आंबेडकरी जनतेत आत्मसन्मान जागृत करण्यावर भर देणे आवश्यक आहे. आणि आंबेडकरी राजकारणाचे अस्तित्व टिकविण्यासाठी अराजकीय पाया भक्कम केला पाहिजे. पक्षाचे श्रेष्ठीजन आणि सभासदांनी कोणत्याही राजकीय पदाची अपेक्षा करता कामा नये. 'काँग्रेस हे जळते घर आहे' असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी म्हटले आहे. परंतु धर्मनिरपेक्षता या वैष्टियामुळे जळत्या घराचा आसरा घेतल्यामुळे सर्व समाज होरपळून गेला आहे. आंबेडकरी राजकारणाच्या अस्तित्वासाठी अस्पृश्य (डिप्रेस्ड सोसायटी) मधील जाती उपजातींनी एकत्र येणे आवश्यक आहे किंवा कोणत्याही एका जातीने तरी आपली स्वतंत्र क्षमता सिध्द करून दाखविण्याची आवश्यकता आहे. रिडोलास आणि नवे हिंदुत्वीकरण आंबेडकरी राजकारणास छेद देण्याचे कार्य करू शकते. आंबेडकरी राजकारणाची तोडफोड करण्यास काँग्रेस पक्षाबरोबर आता हिंदुत्ववादी, कम्युनिस्ट आणि समाजवादी राजकीय पक्षांकडूनही हातभार लावला जात आहे. परंतु आंबेडकरी राजकारणाचे अस्तित्व चिरंतन आहे.

### *संदर्भ सूची*

१. संपा. मून वसंत - डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे खंड १८ भाग १ १९२० ते १९२३ पृ. २४
२. संपा. मून वसंत - डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे बहिष्कृत भारत आणि मूकनायक १९९० मूकनायक पृ. ३७९ (७)
३. संपा गवळी. टी.ए - डॉ. बाबासाहेब आंबेडकर गौरव ग्रंथ १९९९ पृ. २५४/२५५
४. फडके भालचंद्र दिनकर - डॉ. बाबासाहेब आंबेडकर पृ. १९०
५. संपा. पवार दया व इतर - डॉ. बाबासाहेब आंबेडकर गौरव ग्रंथ महाराष्ट्र राज्य साहित्य ऑक्टोबर १९९० आणि संस्कृती मंडळ, मुंबई पृ. १८७
६. संपा. मून वसंत - डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे महाराष्ट्र शासन खंड १८.



*प्रा.डॉ.भगवान माने*
*राज्यशास्त्र विभाग आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन आणि विकास केंद्र,*
*शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.*

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- Google Scholar
- EBSCO
- DOAJ
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Indian Streams Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.org